नासा येवतीकर

# सारीपाट



# सारीपाट

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सारीपाट

ना सा येवतीकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# सारीपाट

लेखक
नागोराव सा. येवतीकर
http://nasayeotikar.blogspot.com
फ़ोन – 9423625769
पत्ता : नागोराव सा. येवतीकर
मु. येवती पोस्ट येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड

ईमेल - nagorao26@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway


Thane.

प्रकाशन १४ एप्रिल २०२०



©esahity Pratishthan®2020


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .











http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shala_ani_shikshak_nasa_yeotikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jagruti_nasa_yewtikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mi_ek_shikshk_nasa_yeotikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/haravlele_dole_nasa_yewtikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sanvedana_nagorao_yewtikar.pdf

## ना सा येवतीकर



शिक्षकी पेशाकडे काही शिक्षक उपजीविका म्हणून पहातात तर काही जीविका म्हणून पहातात. शिकवणं हाच त्यांच्या जीवनाचा मूलाधार असतो. नासा सर या दुसऱ्या प्रकारचे शिक्षक आहेत. हाडाचे. त्यांच्या रक्तात लाल, पांढऱ्या पेशींबरोबरच खडू आणि फ़ळयाच्या काळया पांढऱ्या पेशीसुद्धा सापडतील असे अस्सल शिक्षक.

व्यवसायाने ते प्राथमिक शिक्षक (जिल्हा परिषद प्राथमिक कन्याशाळा, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड) आहेत.

शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड त्यामुळे विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात वैचारिक लेख लिहिण्याचा त्यांना छंद आहे. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख प्रकाशित झाले आहेत. दैनिक लोकपत्रमध्ये दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली एक वर्ष स्तंभलेखन केले आहेत, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडले होते. ते लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहितात तसेच त्याना मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार करतात. ते दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेजवर प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी याच ई साहित्यने संवेदना, मी एक शिक्षक, जागृती, शाळा आणि शिक्षक ही वैचारिक लेख असलेली ई पुस्तके आणि हरवलेले डोळे हा ई कथासंग्रह प्रकाशित करण्यात आले आहे. त्यांणा वाचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

विद्यार्थ्यांना सतत कामात व्यस्त ठेवण्यासाठी विविध उपक्रम तयार करतात आणि त्यां उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

नासांचे सहावे पुस्तक “सारीपाट” प्रसिद्ध करताना आम्हाला अभिमान वाटतो. या संग्रहातील अनेक कविता या शालेय क्रमिक पुस्तकात निवडल्या जातील याची मला खात्री आहे.

कृपया आपली मते नासा सरांना कळवा. त्यांचा संपर्क क्रमांक 9423625769 असून nagorao26@gmail.com हा त्यांचा मेल पत्ता आहे.

नासा हे सातत्यपूर्ण लेखक आहेत आणि आपले लेखन त नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतात. त्यांचा http://nasayeotikar.blogspot.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल.

त्यांच्या संपर्कात रहा. तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवा. नासांच्या तळमळीने चाललेल्या नवभारतनिर्माणात आपण सामिल व्हा.

आम्ही तर आहोतच.

सुनील सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रस्तावना -

अरुण वि.देशपांडे -पुणे.

९८५०१७७३४२

कविता रसिकांना नमस्कार,

आपल्या सर्वांचे परिचित साहित्यिक -कवी मित्र, आणि प्रयोगशील -विद्यार्थी-प्रिय शिक्षक अशी ज्यांची उचित अशी ओळख आहे, अशा श्री. ना. सा. येवतीकर सर यांच्या " सारीपाट " या पहिल्या कविता-संग्रहाची प्रस्तावना लिहिणे माझ्यासाठी मोठी बहुमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

मित्र हो - गेल्या अनेक वर्षांपासून साहित्य-लेखनामुळे ना. सा. सरांशी माझा स्नेह आहे, लेखन मैत्री आहे, मेसेजच्या माध्यमातून आमच्यात वेळोवेळी अतिशय उत्साहवर्धक संवाद होतात. याभेटीतून मला एक सतत जाणवते ते म्हणजे. नासा सर, यांचे व्यक्तिमत्व आतून-बाहेरून झपाटलेले आहे, त्यांच्यातील उपक्रमशील आणि विद्यार्थी-मित्रांना कायम काही नवे देण्याची तळमळ असणारा शिक्षक मला कायम भारावून टाकतो. असे शिक्षक ज्या विद्यार्थ्यांना, शाळेला आणि परिसराला भेटतात ते खरोखरीच मोठे भाग्यवान आहेत "असे मी म्हणेन. नासा सर, शालेय -मित्रांसाठी नवे नवे उपक्रम राबवीत असतात, जे जे चांगले, माहितीपूर्ण, संस्कारक्षम असे आहे ते", माझ्या विद्यार्थ्यांना मिळावे "यासाठी त्यांची सततची धडपड आणि मनाचा ध्यास मला खूपच कौतुकास्पद वाटतो.

त्यांच्या शाळेत सध्या काव्यांगण या उपक्रमांतर्गत ते रोज एका कवीची कविता फलकावर लिहून मुलांना वाचावयास देत आहेत. या उपक्रमासाठी त्यांनी मुलांसाठी लिहिणाऱ्या मराठीतील कवी-कवयित्रींना कविता लेखनाची विनंती केली आहे, आनंदाची गोष्ट ही आहे की. त्यांच्या विनंतीला मान देत मान्यवर या उपक्रमासाठी लेखन सहकार्य देत आहेत. नासा सरांचे हे विशेषच आहे की, ते स्वतः खूप काही करतात, आणि आपल्या मित्रांच्या कडून ही करवून घेणे त्यांना छान जमते ", हे असे

होणे याचे कारण नासा सरांच्या सेवाभावीवृत्तीत, आणि समाजसेवा कार्याच्या भावनेत आहे ", याची जाणीव त्याच्या मित्रपरिवाराला आहे.

नासा सर, मला देखील त्यांच्या उपक्रमात मला लेखन -सहभागी करून घेतात, सर, तुमचे खूप आभार. हे सर्व सविस्तर लिहिण्याचे कारण. म्हणजे. नासा सरांचा कविता -लेखन प्रवास सुद्धा एका कविमनाच्या व्यक्तिमत्वाचा कविता -अभिव्यक्त होण्याचा प्रवास आहे. त्यांच्या पहिल्या कविता -संग्रहाचे शीर्षक आहे-"सारीपाट ",

हे शीर्षक अतिशय व्यापक आणि अर्थपूर्ण असे आहे. विविध भाव-भावनांचा, रंगी-बेरंगी शब्द-सुमनांचा हा सुरेख असा शब्द-स्वरूपातील भावनिक असा "सारीपाट " नासा येवतीकर या कवीने आपल्यापुढे मांडला आहे. आपल्या आयुष्यात संसारिक जीवनात - संसाराचा सारीपाट " मांडला जातो. हा सारीपाटाचा खेळ खेळणे, तो रंगवणे ", हे एकट्याचे नसते, ते पती-पत्नी -जोडीचे असते. भावनिक गुंतवणूक आणि एकमेकांना सांभाळून घेणे म्हणजेच "सारीपाट " असतो.

नासा सरांच्या कविता-संग्रहाचा "सारीपाट " हा खूप वेगळया अर्थाचा आहे. या कवीने -सामाजिक भावना, माणूस, माणुसकी आणि विविध भावनिक घटक. या कवितेच्या सारीपटावर मांडून ठेवले आहेत ", असे म्हणावेसे वाटते.

कविमनाच्या -शिक्षक असलेल्या नासा सरांच्या कविता. या प्रबोधन करणाऱ्या आहेत, मुलांच्यासाठी असणाऱ्या कविता माहितीपूर्ण आणि ज्ञानवर्धन करणाऱ्या आहेत. आपल्या भावनिक आणि सामाजिक विश्वात महत्वाचे स्थान असणाऱ्या. नाती, व्यक्तीस्वरूप, आपण सांस्कृतिक जीवन संपन्न करणाऱ्या सणाबद्दल, तसेच आपल्या जगण्याला आधुनिकता देणार्य अनेक महत्वाच्या गोष्टीबद्दल. नासा सरांनी उत्तम कविता लिहिल्या आहेत, अशा विविध विषयावरील कवितांनी हा "सारीपाट " सजला आहे.

साध्या, सोप्या शब्दात ही कविता आपल्याशी संवाद साधणारी आहे. कवीची सुबोध लेखन-शैली मनाला भावणारी आहे. काही कविता -अंश उदाहरण म्हणून इथे देणे. उचित ठरेल. ज्यावरून "सारीपाट "संग्रहातील कवितांची अल्प का होईना एक झलक दिल्या सारखे होईल.

कार्याचा आरंभ. दुसऱ्याने करावा हे सांगणे खूप सोपे असले तरी त्यावर या कवीचा विश्वास नाही. म्हणून तो सांगतो -

" सुरुवात स्वतःपासून करू या.

घराचा परिसर गाव स्वच्छ करू या

गावातील घाण सर्व दूर करू या

गावाचे नाव सर्वदूर पसरवू या

गांधीजींनी म्हटले चला खेड्याकडे. (स्वच्छता संदेश ),

२. कुटुंब -व्यवस्थेचे झालेली दुर्दश पाहून व्यथित झालेला कवी म्हणतोय.

" सत्ता संपत्ती धन दौलत हे

मिळविता येतात कधी ही

कुटुंबात संपलेला जिव्हाळा

उभ्या जन्मात मिळणार नाही. ( संवाद. )

३.

सर्वांची लाडकी एसटी , इथे कवितेत "लाल परी झालीय.

"गेल्या कित्येक वर्षापासून

लालपरी गावोगावी फिरते आहे

जनता देखील तिच्या सेवेने

सुखावली आहे. (लालपरी. )

४. आपल्यावर उपकार केले ज्यांनी त्यांची आठवण ठेवली पाहिजे असे कवीला वाटते.

हे सांगणारी एक कविता -

" उपकार केले खूप अशांना विसरू नको

आयुष्यभर ज्यांनी पोसले त्यांना विसरू नको

उपकाराची फेड याच जन्मी करायची

आई-वडिलांची सेवा करण्यास विसरू नको. ( (विसरू नको ),

५.

दारू हे व्यसन आयुष्य उध्वस्त करणारे आहे. त्याची ही कविता.

चल वेळीच जागे होऊन

दारू पासून राहा दूर दूर

आयुष्यात वाढ होईल

जीवनात मिळेल सूर. (दारू ).

६. शिक्षक कसा असतो " हे सांगणारी कविता.

मुलांच्या मनात काय आहे

आपणास करायचे काय आहे

हे ज्याला कळते

तोच खरा शिक्षक.

रसिक हो, संग्रहातील सगळ्याच कवितांचा आढावा इथे घेणे शक्य नाही. नासा सरांच्या "सारीपाट "संग्रहातील कविता तुम्हाला एक सामाजिक -भान नक्कीच देतील, इंटरनेट वरील साहित्यात "सारीपाट " या ई-कविता-संग्रहाची मोलाची भर पडते आहे, याचा खूप आनंद वाटतो. आपल्या सर्वांच्यावतीने कविमित्र -श्री नासा सरांना खूपखूप शुभेच्छा.

स्नेहांकित -

अरुण वि. देशपांडे -पुणे.

मोबा -9850177342

## सारीपाट - मनोगत

सारीपाट हे काव्यसंग्रह आपल्या हाती देताना मला मनस्वी विशेष आनंद होतो आहे. कविता लिहिण्याचा छंद गप्प बसू देत नाही. म्हणून माझ्या मनात आलेले विचार काव्याच्या स्वरूपात मांडण्याचा एक प्रयत्न केलोय. ते मी या ई पुस्तकाच्या माध्यमातून आपणासमोर मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे. मला आशा आहे की, आपणांस ते नक्की आवडेल.

या पुस्तकात काही चूका किंवा त्रुटी आढळून आल्यास निःसंकोचपणे त्या चूका माझ्या निदर्शनास आणुन दिल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन. पुस्तकातील विचार किंवा हे काव्यसंग्रह आपणास आवडल्यास आपल्या मित्र परिवारात जरूर share कराल अशी अपेक्षा करतो. समीक्षक मित्रांनी या पुस्तकाचे समीक्षण करावे. धन्यवाद

- नागोराव सा. येवतीकर

★★★★★★★★★★★★★★★★★★

अर्पण पत्रिका

या काव्य निर्मितीसाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहित करणारे

माझ्या आई-वडीलासह सर्वाना अर्पण ...........

नागोराव सा. येवतीकर

★★★★★★★★★★★★★★★★★★

# सारीपाट

## ।। संगणक ।।

नाही कोणते बंधन
मुक्तपणे वाचा लिहा
रिकामावेळ सत्कारणी
माहिती साठवत राहा

हवी ती माहिती मिळे
बटणाच्या क्लीकवर
नका राहू अंधारात
बोलू जरा ज्ञानावर

एकमेकां ज्ञान देऊन
होऊ चला समृद्ध
सर्वांनाच ज्ञान होई
लहान असो वा वृद्ध

संगणकाचे जाळे पहा
पसरले इथे तिथे सर्वत्र
एका क्षणात सर्वांना
माहिती मिळते एकत्र

## ।। स्वछता संदेश ।।

लक्ष देऊ या सारे स्वच्छतेकडे
वाटचाल करू या समृद्धीकडे

सुरुवात स्वतःपासून करू या
रोज स्नान करून स्वच्छ होऊ या
स्वच्छ कपडे परिधान करू या
एकवार पाहू या आपल्याकडे

पहिले घराची साफसफाई करू या
ओला सुका कचरा वेगळं करू या
कचऱ्याची अशी विल्हेवाट लावू या
जाणीवपूर्वक लक्ष देऊ कचऱ्याकडे

घराचा परिसर गाव स्वच्छ करू या
गावातील घाण सर्व दूर करू या
गावाचे नाव सर्वदूर पसरवू या
गांधीजींने म्हटले चला खेड्याकडे

शाळा परिसर स्वच्छ सुंदर ठेवू या
आनंदी वातावरणात शिक्षण घेऊ या
शिक्षणाने सर्वजण गुणवंत होऊ या
धडे घेण्यासाठी जाऊ या शाळेकडे

आपल्या स्वछतेवरून घर कळते
घरावरून गावाची ओळख होते
गाव मिळून जिल्हा प्रसिद्धीस येते
जगाचे लक्ष जाते मग देशाकडे

## पोळा

वर्षभर राबून राबून
बळीराजाला देतो साथ
शेतात काम करून
देतो मदतीचा हात

कधी थकत नाही ना
कधी घेतो विश्रांती
दिवसरात्र काम करून
उत्पन्नात करतो क्रांती

वर्षातून एकदा येतो
त्याला सजण्याचा सण
झुले झुंबर पायात वाळा
आनंदी आनंद पोळा दिन

# संवाद

हल्ली होतच नाही
प्रेमाचे संवाद कुटुंबात
सगळेच व्यस्त आहेत
आपाआपल्या कामात

एकत्र कुटुंबात होता
प्रेम आणि जिव्हाळा
एकमेकांचा राहत असे
एकमेकांशी खूप लळा

आजी आजोबांचे पूर्वी
मिळत होते माया ममता
छान छान गाणे गोष्टी
ऐकत असे झोपता झोपता

विभक्त होता कुटुंब
संपला त्यांचा जिव्हाळा
आपल्याच कोशात
त्यांचा जीव गुरफटला

लेकरांना मिळेनाशी झालं
घरातल्या वाडवडिलांचे प्रेम
आई-बाबांना मिळेना वेळ
मुलं व्यस्त खेळण्यात गेम

सत्ता संपत्ती धन दौलत हे
मिळविता येतात कधी ही
कुटुंबात संपलेला जिव्हाळा
उभ्या जन्मात मिळणार नाही

## शाळा

मला आवडते मनापासून
माझी बालपणीची शाळा
होते खूप सारे लंगोटी मित्र
आम्हांला एकमेकांचा लळा

शाळेला होती दारे खिडक्या
पण नव्हते बाक बसायला
चटई असलेली टाकलेली
बसायचो आम्ही शिकायला

शाळा होती घराजवळ
भीती कधी वाटली नाही
उशीर झाला म्हणून मला
छडी कधी भेटली नाही

मित्र होते छान छान
नेहमी अभ्यासात मग्न
दिलेले काम वेळेत पूर्ण
कधी आले नाही विघ्न

गुरुजी होते खूपच प्रेमळ
मन लावून शिकवायचे
गोंधळ केला किती तरी
कधीच नाही रागवायचे

शाळेतली शिकवण
विसरले नाही कधी
ताठ मानेने वावरतो
जगतो समाजामधी

## ।। आपली माणसं ।।

देवाची पूजा करणारे हात
माणसांची सेवा करत नाहीत
जेवढा वेळ देवपूजेला देतात
तेवढा वेळ घरात देत नाहीत

पहिल्यांदा घरातल्या सर्वांना
सुखी आनंदी ठेवायला शिकावं
वेळ भेटलाच कदाचित तर
देवाच्या भक्ती मार्गाकडे वळावं

संसार करण्याचा सार कळेना
पण पोथी पुराणात वेळ घालती
देवापुढे वाती लावण्यात व्यस्त
घरात माणसं आजारी पाडती

साधू संत महात्मे महापुरुष
सारे एकच सांगत असतात
मानवाच्या सेवेत देव आहे
देव भेटत नाही कुठे मंदिरात

देवाला गरमागरम नेवैद्य
घरातल्याला शिळे तुकडे
देव खात पण नाही कधी
पण लक्ष सारे त्या देवाकडे

सारे देव पाण्यात ठेवून

देत नाही प्यायला पाणी
काही अर्थ उरतो का गाऊन
देवाची आरती भक्तीची गाणी

आपल्याची काळजी घेताना
देव सदैव सोबतच असतो
दुःखांच्या प्रसंगात नक्की
आपल्या पाठीमागेच असतो

अजून ही सांगणे एकच आहे
नको वेळ वाया घालू पुजापाठात
वयोवृद्ध आई वडिलांची सेवा हीच
पंढरपूर काशी आहे तुझ्या घरात

आई बाबाची मनोभावे सेवा
हाच आपला खरा धर्म आहे
निस्वार्थ भावनेने केलेले काम
हेच आपले खरेखुरे कर्म आहे

तुझ्या भटक्या मनाला आवर
मानवाच्या सेवेत तुझे मन गुंतव
आपली माणसं जपून ठेवली की
यातच खरे पुण्याचे सुख मिळव

## माझा परिवार

माझा परिवार सुखी परिवार
सर्वांच्या भेटीचा दिन रविवार

माझ्या परिवारात नाही तंटा
कामासाठी नाही नकार घंटा

माझा परिवारात आहे माया
वेळ घालवित नाहीत वाया

माझ्या परिवाराला मोठ्यांचे आशीर्वाद
येथे होत नाहीत कोणतेच वादविवाद

माझ्या परिवारात आहे नीतिमत्ता
म्हणूनच सर्वात दिसते गुणवत्ता

माझा परिवार सर्वांसाठी आदर्श
त्यांना पाहून मनात होतो हर्ष

माझा परिवार आहे परोपकारी
प्रेमाचा संदेश पोहोचवी घरोघरी

माझा परिवार आहे संस्कारी
तेच गुण घेऊन जाई परक्या घरी

माझा परिवार आहे स्वर्गाहून सुंदर
प्रत्येकजण होऊ पाहतो सिकंदर

माझा परिवार आहे सर्वांसाठी प्रेरणा
वागणुकीतून मिळते दुसऱ्यांना चालना

# निसर्ग

वर निळे आकाश
खाली निळे पाणी
काठावरती झाडे
पक्षी गातात गाणी

जिकडे पहा तिकडे
परिसर हिरवा हिरवा
मन धुंद होते घेऊन
हवेतला शीत गारवा

झाडावर बघा शोभती
फुले वेगळी रंगबिरंगी
सुगंध दरवळता फुलांचा
माझे मन होते आनंदी

झाडावर माझा सखा
कसा गळ धरून बसे
मन आनंदून जाते
गळाला लागले मासे

सखा असावा सोबतीला
सावली करून पानांची
त्याची माझी साथ जणू
सोबत सात जन्माची

## उन्हाळी सुट्टी

बघता बघता पहा कश्या
संपली सुट्टी उन्हाळ्याची
झाली सर्व तयारी आता
प्रतीक्षा शाळा सुरू होण्याची

संपल्या सुट्या आता
चला शाळेला जाऊ
विसरून सारे दिवस
नव्या मित्रांना भेटू

शाळा सुरू असताना
मनात सुट्याची हुरहूर
गावी जाण्याचा माझा
चाले नेहमीच कुरकुर

एकदाची संपली परीक्षा
धावत पळत घरी आलो
तुरुंगातून जसा सुटतो कैदी
तसा खूपच आनंदित झालो

सुटयात होता ना अभ्यास
ना कसला होता गृहपाठ
दिवसभर उड्या मारायचे
रात्री टीव्हीशी पडे गाठ
माझी कविता

मनात आलेल्या गोष्टी
नोंदविते ही लेखणी
शब्द कागदावर लिहिताना
दिसतात किती देखणी

शाळेच्या पहिल्या वर्गात
कलम गिरवितो पाटीवर
शिक्षणाची सुरुवात होते
लक्ष वळणदार अक्षरावर

मग हाती येतो कागद अन
असेल लिहायला पेन शाईचे
वाचलेले मुद्दे लिहून काढावे
पूर्ण करावे धडे गृहापाठाचे

शिक्षणाने होतो समृद्ध
जीवन जगतो सुखाचे
आत्मा ही आनंदी होतो
विसरतो क्षण दुःखाचे

पेनातल्या निळ्या शाईने
लिहितो शब्द कागदावर
मनी भावना व्यक्त करतो
लिहून कविता आत्म्यावर

## ।। लालपरी ।।

गावोगावी जाऊन भेटणारी
सर्वांची आवडती लाडकी
बघता बघता पहा लालपरी
झाली एकाहत्तर वर्षाची

तिने पाहिले अनेक मोसम
हिवाळा, उन्हाळा पावसाळा
प्रत्येक ऋतूत साथ देते सर्वांना
किती ही त्रास होऊ द्या त्याला

शाळकरी मुलांना घेऊन जाते
त्यांच्या शाळेच्या अगदी वेळेवर
परत घेऊन येते त्या सर्वांना
सायंकाळी शाळा सुटल्यावर

आजी-आजोबा सवलतीत
दूरवर करतात प्रवास
प्रवासाचे एकच आहे साधन
बसवर सर्वांचा विश्वास

गेल्या कित्येक वर्षांपासून
लालपरी गावोगावी फिरत आहे
जनता देखील त्याच्या
सेवेने सुखावलेला आहे

येत्या काळात ही या
बसला येवो चांगले दिवस
लोकांच्या सुरक्षतेसाठी
बसचाच चांगला प्रवास

## मी भारतीय

सर्व जातीच्या लोकांना मान सन्मान आहे
मी भारतीय असल्याचा अभिमान आहे

जगात एक देश जेथे नांदती विविध लोकं
असा हा माझा भारत देश महान आहे

हिंदू असो वा मुस्लिम शीख असो वा इसाई
प्रत्येकांना आपल्या संस्कृतीचा मान आहे

सर्वांचे सण व उत्सव उत्साहात होतात साजरे
शुभेच्छा देतां-घेताना एकमेकांवर प्राण आहे

देशातील एकता संपविण्या झाले अनेक हल्ले
तरी ही जनता एकमेकांत ठेवून जान आहे

## तंबाखूमुक्ती

तंबाखू खाल्याने वाटते
थोड्या वेळेची मजा
सुखी संसाराला मग
आजीवन मिळते सजा

तंबाखूने होतं कॅन्सर
ही सवय बरी नव्हे
थोडी तलफ मिळते
म्हणून भुलून जाऊ नव्हे

सवयीने माणसाची जाते
आहे नाही ती आन बाण
इकडे तिकडे थुंकून थुंकून
परिसर करतात सर्वत्र घाण

बोलता बोलता मध्येच
पिचकारी मारली जाते
पुढच्याला आपल्याविषयी
खूप खूप घृणा वाटते

सोडा आता तंबाखू खाणे
जगा जीवन आनंदाने
बायको लेकराकडे पाहून
त्याग करावा सर्व मनाने

सिगारेट नि गुटक्याने

कर्करोग होतो समाविष्ट
प्रसंगी मृत्यू ही ओढावेल
सुखी संसार होईल नष्ट

तंबाखू व चुन्याच्या मिश्रणाने
जीवन करू नका उध्वस्त
दूर सारा त्याला लगेचच
सारे सुखी राहतील मस्त

तंबाखूला नको म्हणा
जीवन होईल आनंदी
मानवी जन्माचे पुन्हा
मिळणार नाही संधी

नको चोळू हातावरी
तंबाखूला तू चुना
असे सुंदर जीवन
मिळेल काय पुन्हा ?

## शिक्षण

शिकणं झालंय महाग
काही सोपी गोष्ट नाही
पैसा असल्याशिवाय
शिक्षण पूर्ण होत नाही

पहिल्या वर्गात प्रवेश
घेण्यासाठी पहा रांग
पैसे जवळ असतील
तरच ठेवता येथे टांग

श्रीमंतांच्या पोरासाठी
मोठ्या शाळा उघडायचं
गरीब बापाच्या पोरांनी
सरकारी शाळेत शिकायचं

सर्वांसाठी मोफत शिक्षण
इथे नावालाच असते
उच्च शिक्षण घेण्यासाठी
गरिबांकडे पैसा कुठं असते

आजचं शिक्षण पूर्णपणे
पैशाने आहे भरलेले
पैसा नसेल जवळ तर
शिक्षण असते उरलेले

शिक्षणातील पैशाचा खेळ
लगेच संपवायला हवे
गरीब घरातच राहतील
जग होईल श्रीमंतांच्या नावे

## मुलीचं लग्न

मुलगी वयात आली
की हर एक बाप
पडतो काळजीत
तिच्या प्रत्येक
पावलागणिक
पाहत असतो
ती कुठं आहे जात ?
बाहेरची स्थिती
बापाला झोपू देत नाही
अगदी स्वस्थपणे
जेवू ही देत नाही
कधी पोट भरून
पेपरातल्या बातम्याने
काळीज धस्स करते
मुलगी जेंव्हा बराच वेळ
घराबाहेर असते
लग्न करून एकदाचे
दोनाचे चार हात केले
की जबाबदारी संपते
एक बाप म्हणून
त्यासाठीच तर करतो
खटाटोप तिच्या लग्नाची
मुलगी त्याला ओझं नसते
पण एक जबाबदारी
एक कर्तव्य म्हणून
जेंव्हा विचार करतो
तेंव्हा त्याचं काळीज

त्याला खायला होतं
लोकांना काय कळतं
ते मुलींना डोक्याचं ओझं
परक्या घरची देणं
अशी उपाधी लावतात
पण बाप कधी तिला
तसं समजतच नाही
त्याच्या काळजाचे वेध
कुणालाच कळत नाहीत
मुलीचे लग्न होईपर्यंत.....

# लग्न

लग्न म्हणजे काय असते ?
दोन नव्या जिवाचे मिलन
अजाणतेपणी राहणाऱ्या
दोन नव्या मनाचे संमेलन

प्रत्येकाला आतुरता असते
जीवनात एकदा लग्नाची
साथीदार शोधत असतात
गाठ पडलेली असते जन्माची

पाहणीचा कार्यक्रम होतो
पसंद नापसंद कळविले जाते
पसंदीच्या स्थळाला निरोप मिळे
लग्नाच्या तयारीला मग सुरू होते

लग्नाची सर्वांना लागते चिंता
खरेदी करण्याची खूपच घाई
लग्नानिमित्त सर्व पाहुण्यांची
येणाऱ्या जाणाऱ्यांची सरबराई

लग्नाची वेळ येते जशी जवळ
होतो आनंद सर्व जनमनात
दोन नवी पाखरे एका घरट्यात
येत असल्याचा आनंद मनात

लग्नानंतरच सुरू होतो खरा

सुखी जीवनाचा प्रवास
एकमेकांना मिळतो येथे
सोबत राहण्याचा सहवास

सुखदुःखाचे प्रसंग येतात
त्याला तोंड कसे द्यावे ?
लग्नानंतरच्या संसारात
हे सारे शिकत जावे

अविवाहिताना काय माहीत
लग्न म्हणजे काय असते ?
लग्न केल्यावरच कळते की
संसार म्हणजे काय असते ?

## राजकुमार

( बारा अक्षरी कविता )

ती रोजच विचार करत असे
तिच्या स्वप्नातील राजकुमारचा
तो कधी येऊन घेऊन जाणार
ती वाट पाहते राजमहालाचा

दिवस असेच सरत जातात
रोजच ती त्याची प्रतीक्षा करते
तिला विश्वास असतो स्वप्नांवर
म्हणून तर त्याची वाट पाहते

खरा राजकुमार एक दिवस
तिला नेण्यासाठी तिच्या घरी येतो
राजकुमार राजस सुकुमार
पाहताच मनातून आवडतो

महाल जरी नसेल घर तरी
तिला ते मनापासून आवडते
राजकुमारासोबतचा संसार
झाडा-वेली प्रमाणे फुलू लागते

दोन वर्षे सरले गोडी संपते
छोट्या गोष्टीवरून वाद होतात
कालचा सुकुमार नकोसे होते
स्वप्नातले दिन संपून जातात

एके दिवशी एकटीला टाकून
तो जातो आपल्या स्वप्नांच्या देशात
ही एकटी पलंगावर बसून
स्वप्नाची उजळणी होती करत

तिला झालेल्या गोष्टीचा आत्ता खूप
मनातून पश्चाताप वाटत राहते
त्याच्यासोबत एकदा तडजोड
केलं नसल्याचं मनी राग येते

निघून गेली वेळ आयुष्यातील
जोरात रडून आहे का फायदा
स्वप्न वास्तव हे कळाले असते
आनंदात जगले असते सदा

## विसरू नको

उपकार खूप केले अश्यांना विसरू नको
आयुष्यभर ज्यांनी पोसले त्यांना विसरू नको

नऊ महिने गर्भात ठेवून वाढविले त्या
गरीब माय माऊलीला तू विसरू नको

तुझे टीचभर पोट भरण्यासाठी त्यांनी
सोसले किती कष्ट त्या कष्टाला विसरू नको

शिक्षण घेण्यासाठी तुझे बोट धरले
शाळेत घेऊन जाणाऱ्या हातास विसरू नको

तुला काय हवे काय नको याची
काळजी करणाऱ्यास विसरू नको

शिक्षण झाले पूर्ण नोकरी मिळाली
घास खातांना भाकरीस विसरू नको

लग्नानंतर राजा राणीचा संसार झाला
मुलगा जन्मला बापास विसरू नको

आई वडील कधी भार होत नाहीत
जन्मदात्या माता पित्यास विसरू नको

ज्याने तुला शाळेचा रस्ता दाखविला
त्याला घरात मान द्यायला विसरू नको

संसारात म्हटलं की असतात वादविवाद
त्याचे निराकरण करायला विसरू नको

उपकाराचे फेड याच जन्मी करायचे
आई-वडिलांची सेवा करण्यास विसरू नको

मिळेल तुला जीवनात सुख-शांती
स्वतःच्या कर्तव्याला कधीच विसरू नको

## आशा

जीवन सुखी समाधानी
जगण्यास ठेवा थोडी आशा
काम पूर्ण झाले नाही तर
पदरी मिळते ती निराशा

कसलीही अपेक्षा न ठेवता
करत जावे निस्वार्थी काम
अश्या कामात मिळतो आनंद
नक्कीच मिळते कामाचे दाम

पैसे खूप मिळावे वाटते
असेल काम करायला कमी
अशा विचाराने पुढे चालून
खड्डुयात पडतो आम्ही

लालच खूप वाईट असते
त्याने माणूस विसरतो स्व
आपले तुपले कोणी दिसेना
पैसा हेच त्याला वाटे सर्वस्व

जवळची माणसे अश्याने
दूर दूर निघून जातात
संकट समयीच्या वेळी
कोणीच जवळ नसतात

कामाप्रमाणे दाम घ्यावे
नको आमिषाचा पैसा
जीवन होईल सुकर
जर सोडली अभिलाषा

## मोबाईल

मोबाईल आल्यापासून
पहा काय क्रांती झाली

कोणाच्याही खिशात आत्ता
ट्रींग ट्रींग वाजया लागलंय
दूरवरचे लोकांसोबत
क्षणात बोलता यायलंय

पूर्वी फोन लावण्यासाठी
चौकाचौकात जावे लागायचं
बुथवर रांगेत बसून फोनची
खूप प्रतीक्षा करावं लागायचं

मोबाईल आला की बदलला
इतरांशी बोलण्याचे तंत्र
कोठे ही अन केंव्हाही
बोलण्याचा मिळाला मंत्र

स्मार्टफोनने तर कहरच केला
तळहातावर सर्व दुनिया दिला
गाणे चित्रपट असो मालिका
घरात बसून मिळे बघायला

फोनवर तासनतास बोलण्या
सारखे संवाद झाले कमी
छोट्या मेसेजच्या वापराने
मितभाषी झालोय आम्ही

सदानकदा आमचे डोके
मोबाईल मध्ये खुपसून

# मरण

चोर पावलाने येतो
कुणालाही न सांगता
क्षणात संपून जाते सर्व
आत्मा जातो निघून
उरते फक्त शरीर
जन्म कधी होणार
हे एखादेवेळी कळते
मात्र मरणाचे तसे नसते
चालता बोलता जेंव्हा
एखाद्याला मरण येते
काळ आणि वेळ एकत्र
त्याचवेळी आलेले असते
सर्वांच्या चेहऱ्यावर दुःख
जाणाऱ्याचे आठवणी
प्रत्येकजण सांगत असते
कमवा किती ही पैसा
तो सोबत घेऊन येत नाही
आयुष्यभर केलेल्या कर्माची
चर्चा झाल्याशिवाय राहत नाही
म्हणून चांगले कर्म हीच आपली
खरी धनदौलत संपत्ती आहे
आयुष्यात केले काही पुण्यकर्म
तीच खरी धनसंपत्ती आहे

## खेळ आणि शिक्षण

जेंव्हा मला मिळतो वेळ
तेंव्हा तेंव्हा खेळतो खेळ
कशाचेही नसते भान
अभ्यासाशी नसतो मेळ

बालपणापासून आवड
विटी दांडू खेळण्याची
मित्रांसोबत खेळताना
भरपूर मजा यायची

थोडा मोठा झालो तेंव्हा
आवड निर्माण झाली क्रिकेटची
सोबत असायची बॅट बॉल
तीन लाकडं घेऊन विकेटची

टीव्हीवर धोनीला पाहताना
आपण ही असायचं खेळावं
मैदानावर जाऊन धोनीसारखं
भरपूर धावा चोपून काढावं

गल्लीत खेळणारे आम्ही
दिल्लीतील सामना बघायचो
टीम इंडिया जिंकला की
मोठे मोठे फटाके उडवायचो

खेळल्याने पोट भरत नाही

वाड वडील खूप सांगायचे
त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्षून
आम्ही मात्र हट्ट नाही सोडायचे

त्यांच्या बोलण्याचे महत्व
आज कळायला लागते
काही काम भेटत नाही
वेळ निघून गेलेली असते

खेळाला ही महत्व द्यावे
सोबत अभ्यास ही असावा
त्याच्याच बळावर तर
लागते रोजगार मिळवावा

## पसारा

घरात महिला नसण्याचा काय परिणाम होतो
घरातील एक सामान एका जागेवर नसतो

सकाळी लागणारा ब्रश असो साबणही मिळत नाही मात्र
जागेवर कोणतेच नसते शोधत राहावे लागते सर्वत्र

झोपण्याची जागा नसते स्वच्छ सर्व खरकटे अंथरुणावर
अंग पुसलेले ओले कपडे तसेच पडून राहतात जागेवर

घरात आलेला रोजचा पेपर नीट नसतो वाचून झाले तरी
घर नसते कधी घरासारखे जर बायको नसेल घरी

घर होऊन जाते घाण सगळीकडे केरकचरा
घरातल्या सर्व भांडीकुंडी सामानाचा होतो पसारा

साफसफाई स्वच्छता नसल्याने घरात सुटतो सगळीकडे वास
एक क्षण बसावे वाटत नाही कोंडल्यासारखा वाटतो श्वास

ती घरी असताना बघा कशी घेते प्रत्येक गोष्टीची काळजी
तिच्या कोणत्याही कष्टाची आपण घेत नाही काळजी

महिला घरात असल्याची गोष्टच असते न्यारी
तिच्या येण्याने प्रत्येकाचे जीवन होते लय भारी

## ।। प्राणी ओळख ।।

प्राण्यांचे पाहू नाना चित्र
ओळखूया त्यांचे चरित्र

सिंह राजा जंगलाचा
थरकाप उडतो मनाचा

वाघ आहे राष्ट्रीय प्राणी
पाहून होते पाणी पाणी

हत्ती आहे सर्वात शक्तिमान
तोच वाटतो मला बुद्धिवान

उंच मानेचा असतो जिराफ
दुरवरचे दिसते सारे साफ

हरीण सर्वात चपळ पळणारा
त्याहून नाही कोणी धावणारा

कोल्हा म्हणजे धूर्त प्राणी
दिसता काकडी तोंडात पाणी

हिमालयात दिसला गेंडा
त्याच्याजवळ लावू झेंडा

अस्वल प्राण्यांवर फारच केस
पाहताक्षणी तोंडाला येतो फेस

राष्ट्रीय पक्षी रंगबिरंगी मोर
नृत्य पाहून होते मनविभोर

## सुट्टीतील मजा

लागली उन्हाळी सुट्टी
जमली मित्रांची गट्टी
चोर पोलीस खेळू चला
करून कागदाची चिठ्ठी

ना अभ्यास ना गृहपाठ
नाही कोणती ही सजा
खूप खेळू उड्या मारू
घेऊ चला सुट्टीतील मजा

राम्या गण्या सच्या चला
निघा घराबाहेर आत्ता
सुट्टी आपली सुरू झाली
खेळू अलबत्ता खलबत्ता

सकाळी सकाळी चला
मिळून क्रिकेट खेळू
चौकार षटकार मारू
मैदानावर खूप खूप पळू

संपला क्रिकेटचा सामना
सूर्य आला बघ डोक्यावर
दुपारची वेळ झाली आहे
उड्या मारू या पाण्यावर

पाण्यात खूप उड्या मारू
एकमेकांवर उडवू पाणी
पाण्यात खेळ खेळताना
मजेशीर गाऊ या गाणी

## ।। तिची कहाणी ।।

चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती
पूर्वीपासून मला ठेवले बांधून
घराबाहेर काही निघायचे नाही
फक्त चूल नि मूल सांभाळावे
बाहेरचे काम बघायचे नाही
जुन्या काळापासून आमची
होत आली बघा अशी माती
चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती

जिच्या उदरातून जन्म घेतला
ती आई सुद्धा एक नारीच आहे
मग मुलगी नको म्हणून हा
गर्भ पाहून निर्णय घेतो आहे
लोकांची अशी गुंग झाली मती
चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती

रक्षाबंधन सण येता जवळी
बहीण पाहिजे राखी बांधण्यास
सुखात असती सर्व गणगोत
दुःखात कोणी नसतो रडण्यास
तरी मुलींचे गर्भ का पाडती
चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती

संसार सुखाचा करण्यासाठी
सर्व नवऱ्याना पाहिजे बायको
मुलगाच पाहिजे या हट्टापायी
मुलीचा जन्म यांच्या घरात नको
लग्नाला मुली मिळतील किती ?
चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती

आई पाहिजे, बहीण पाहिजे
परिवारात एक बायको पाहिजे
वंशाची वेल वाढविण्यासाठी
कुटुंबात एक मुलगी पाहिजे
असे उपदेश अनेकजण सांगती
चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती

वेळीच आवरा स्वतःच्या मनाला
मुलगी-मुलगी भेद मानू नका
मुलगा असेल वंशाचा दिवा
म्हणून मुलीला दूर सुरू नका
यानिमित्ताने आठवण करून देती
चिंपाझीसह ती बोलत होती
तिची कहाणी सांगत होती.

## आई

आई म्हणजे काय असते ?
आई म्हणजे काय असते ?
आई म्हणजे आई असते
साऱ्या जगाची माई असते
हसणाऱ्यांच्या सुखात असते
रडणाऱ्याच्या दुःखात असते
पळणाऱ्यांच्या पायात असते
उडणाऱ्यांच्या पंखात असते
जगात आई सर्वत्र असते
आई म्हणजे काय असते ?
कापसाची मऊ रुई असते
पोटाला चिमटा देऊन
बाळाचे पोट भरविते
स्वतः दुःखात राहूनी
इतरांचे मोट चालविते
सर्वांना जागविणारी
ती आईच असते
आई म्हणजे काय असते ?
औषधाने भरलेली सुई असते.
आई म्हणजे काय असते ?
थंडगार पाण्याची सूरई असते
मंजुळ गाण्याची सनई असते
थंड दुधावरची मलई असत

## ।। दारू ।।

पहिले पहिले घोट घेताना
खूप आवडते ही दारू
घेतल्यावर वागतो कसा
पहा अंगात घुसलाय वारू

दारू पिण्यासाठी यांना
एखादं कारण पुरे असते
कधी सुखाच्या प्रसंगी
तर दुःखात पिले जाते

प्रथम वेळी घेतांना
काहीच वाटत नाही
रोजच्या बैठकीने मात्र
सायंकाळी करमत नाही

दारूच्या या व्यसनाने
जीवन होते बरबाद
अति मद्यपान केल्याने
अनेकजण झाले बाद

दारू पिल्याने काही काळ
कळेना आपण काय करतो ?
नशेत झालेल्या चुकीचा मग
उगीच पश्चाताप करत बसतो

दारूने आतापर्यंत कोणाचे
काहीही भले झाले नाही
एक तर जातो पैसा व्यर्थ
दवाखाना ही सुटत नाही

कित्येकांच्या संसाराचा
दारूने घोटलाय गळा
घरात नाही दाणापाणी
सुटल्या मुलांच्या शाळा

डोळ्यासमोर घडतंय तरी
यांना येत कळवळा नाही
रोज दारू घेतल्याशिवाय
रात्रीला झोप लागत नाही

दारूच्या व्यसनापायी पहा
काही झालेत कर्जबाजारी
कसे फिटेल कर्ज चिंतेपायी
पिऊन पडतात भर बाजारी

क्षणभराच्या सुखासाठी
दारूच्या आहारी जाऊ नको
जीवन खूप सुंदर आहे
परत बैठकीत बसू नको

चल वेळीच जागे होऊन
दारूपासून राहू दूर दूर
आयुष्यात वाढ होईल
जीवनात मिळेल सूर

## ।। मानवाची प्रगती ।।

पशू-पक्ष्यांचा शिकार करून
आदिमानव राहत असे जंगलात
मिळाली नाही काही शिकार तर
कंदमुळे खाऊन जीवन जगत

घनदाट जंगलात न राहता
नदीकाठावर त्याची वस्ती
जगण्यासाठी हवे म्हणून
जिथे पाणी तिथेच बस्ती

अंगावर नव्हते कपडलत्ते
वापरत होते साल झाडांची
काळजी होती त्यांना फक्त
आपले सर्वांग झाकण्याची

निवाऱ्यासाठी नव्हते घर
नव्हते कोणते अंथरण
आभाळ त्याचे छत होते
तर जमीन त्याचे अंगण

अग्नीचा शोध लागला अन
मानवाची सुरू झाली प्रगती
दगड गेले घरंगळत अन
चाकाला मिळाली वेगाची गती

अन्न, वस्त्र आणि निवारा

याची गरज भागू लागली
मानव प्रगत होत गेला
त्याची आशा वाढू लागली

हळूहळू त्याचे जीवन आत्ता
एका रोबोटसमान झाले
आदिमानवाचे जीवन जगणे
आत्ता इतिहासजमा झाले

निसर्गाला पूर्ण विसरून
जरी मानवाने केली प्रगती
उपकार विसरू नये नसता
जीवनाची होईल अधोगती

## ।। फार झाला ।।

हातातून गेले क्षण वेळ ही संपली
कळले जेंव्हा मला, उशीर फार झाला

सूर्याच्या लख्ख प्रकाशात केला नाही
सुरुवात जेंव्हा केली अंधार फार झाला

मनधरणी मिळविण्या केली विनवणी
होकार मिळविण्या नकार फार झाला

कोणी दुकानदार जवळ येऊ देत नाही
सावकार बोलतो कसा उधार फार झाला

## महाराष्ट्र गौरव गीत

आपली भाषा आपले लोक
आपला प्रांत आपले राष्ट्र
चालावा आपला व्यवहार
असा हा आपला महाराष्ट्र

येथील लोकं बोलती मराठी
येथे व्यवहार होती मराठी
पुस्तकांची भाषा ही मराठी
महाराष्ट्राची राजभाषा मराठी

मुंबई आहे राज्याची राजधानी
येथे घडते आर्थिक कहाणी
नागपूर राज्याची उपराजधानी
संत्री खाऊन गाती गोड गाणी

राज्यात एकूण छत्तीस जिल्हे
आहेत अनेक गड आणि किल्ले
राष्ट्र निर्मिण्या झाले अनेक हल्ले
घाबरणार कसे महाराष्ट्राची पिल्ले

सोनियाचा मे महिन्याचा एक
राज्यात नांदती लोकं अनेक
गुणगौरव गातसे माय लेक
माझा महाराष्ट्र सर्वात नेक
अडचण

प्रत्येकाच्या जीवनात
अडचणी येतच असतात
अडचणीला बघून
कोणी पळत नसतात

जे अडचणीला बघून
पळ काढत असतात
समाजातील लोकं त्यांना
भित्रे भागूबाई म्हणतात

## ।। पाडव्याचे मागणे ।।

शेतकऱ्यांचा सण
आला बघा पाडवा
नववर्षाची सुरुवात
त्यात आंब्याचा गोडवा

शेतातली कामे नव्याने
पुन्हा सुरुवात करतो
नव्या जोमाने उत्साहाने
पुन्हा कामाला लागतो

गतवर्षीचा जमाखर्चाचा
हिशेब एकदा पाहतो
असेल त्या परिस्थितीत
शेतात पुन्हा कष्ट करतो

थकत नाही शेतकरी
म्हणून मिळते भाकर
गोडी चाखायला मात्र
त्याला मिळेना साखर

थकत नाही दमत नाही
रात्रंदिवस करतो काम
पिकलेल्या मालाला कधीच
मिळत नाही त्याला दाम

दरवर्षी पाडव्याला तो

नवी नवी गणितं आखतो
नशिबावर विश्वास ठेवून
तो नवा जुगार खेळतो

यावर्षी तरी खूप पिकून
कर्जाचे कमी होईल डोंगर
या एका विश्वासाने तो
पुन्हा हातात घेतो नांगर

देवा, यावर्षी तरी त्याच्या
पदरात सुख संपत्ती दे
दुसरे काही मागणे नाही
माझा बळीराज्याला
सुखी राहू दे ......!
सुखी राहू दे.......!

## ।। तृप्ती ।।

तिला रोजच घाई
शाळेला जाण्याची
उत्सुकता असते
मुलांना भेटण्याची

शिकविणे तिचा धर्म
कधी सोडला नाही
दिलेले वचन तिने
कधी मोडला नाही

होवो किती ही त्रास
ती न चुकता जायची
तरी ही काही लोक
तिला छळायाची

ती होती खंबीर अन
मनाची होती धीट
आपले कार्य मनाने
करीत होती नीट

काळानेच पहा कसा
केला जीवावर घात
घरातली आणि शाळेतील
मुले वाट पाहिले राहत

सोडून ही दुनिया पहा
ती गेली दूर दूर किती
अमर असेल ती कारण
तिच्या नावात आहे तृप्ती

## ।। शहीदांना नमन ।।

भारताच्या स्वातंत्र्यासाठी
ज्यांनी दिली प्राणाची आहुती
भगतसिंग, सुखदेव, राजगुरू
यांच्या विचाराने झाली क्रांती

व्यक्ती मरत असतो पण त्याचे
विचार कधी ही मरत नाही
हेच शिकवण मिळते आम्हांला
शहिदांना आम्ही विस्मरत नाही

इंग्रजांच्या जुलमी राजवटीला
अनेकांनी केला होता विरोध
अनेकांना दिल्या त्यांनी यातना
इंग्रजांना आला जेंव्हा क्रोध

भारत भू च्या रक्षणासाठी
मागेपुढे कोणी पाहिले नाही
देशासाठी ते तिघे झाले शहीद
स्वार्थी विचार कधी केला नाही

वंदन करतो त्या वीर सपुतांना
जे देशासाठी झाले अजरामर
आठवण करूनी त्यांच्या कार्यांना
जिवंत ठेवू स्वातंत्र्यलढ्याचा समर

## होळी

काही गोष्टी लक्ष्यात ठेवून
खेळ खेळूया रंगाची होळी
वापरून केमिकल खराब रंग
होणार नाही कोणाची खेळी

प्रत्येक सण आपणाला
काही तरी सांगत असतो
त्याचीच जाणीव ठेवून
सण साजरा करीत असतो

नको पाण्याची नासाडी
पाणी आहे अनमोल
कोरडा रंग खेळू या
जाणुनी जीवनाचे मोल

# ।। शिक्षक आणि शिक्षण ।।

मला माहित आहे
मी काय शिकवितो
माझ्या शिकवणीतून
उद्याचं भविष्य रचवितो

मुलांच्या बालमनावर
रोज संस्कार मी करतो
माझ्या चालण्या-बोलण्यातून
चालता बोलता माणूस घडवतो

कोणी काही बोलले
म्हणून डळमळत नाही
माझे काम पूर्ण करतो
कोणाला काळवण्याचे काम नाही

प्राथमिक शिक्षण म्हणजे
वृक्ष लावण्यासारखे आहे
एका दिवसात पूर्ण होत नाही
काही जादूटोण्यासारखे नाही

म्हणून मित्रांनो सांगावे वाटते की
कोणाच्या बोलण्याने खचू नका
जग काही बोलेल किंवा करेल
मुलांना शिकविणे सोडू नका

प्रत्येक दिवस महत्वाचा असतो
हे फार उशिरा कळायला होते
वेळ निघून जातो टाईमपासमध्ये
कामाच्या वेळी वेळ पळायला होते

वेळ निघून गेली म्हणून रडण्यापेक्षा
जी संधी मिळाली त्याचे सोने करावे
संधी कधी कोणाला सांगून येत नाही
म्हणून प्रयत्न नेहमी चालूच ठेवावे

चिंता करून कधी काही मिळत नाही
काळजीने स्वतःची चिता करू नये
जीवनात आलेल्या संकटाला तोंड देणे
यातच खरे सामर्थ्य भिऊन पळू नये

आत्मविश्वासाने सामोरे जावे म्हणजेच
यश आपल्या पायाशी लोळण घालेल
न्यूनगंड मनात ठेवून काम पूर्ण होत नाही
पक्का निर्धार करून चालावं लागेल

## *शिवबा पाहिजे .....!*

माता जिजाऊच्या संस्काराने
छत्रपती शिवाजी राजे घडले
संघटित करून मावळयांना
स्वतःचे स्वराज्य ते निर्मिले

राज्यात सर्वत्र होता हाहाकार
वाढला होता छळ आणि जुलूम
आपलेच माणसे झाले वैरी
कर्तृत्व असून बनले होते गुलाम

रामायण महाभारतातील गोष्टी
राजेंना बनविले अधिक प्रखर
तेच रामराज्य पुन्हा आणावे
म्हणून दिले त्यांनी वैरीना टक्कर

जिवा, सूर्याजी, तानाजी, बाजीप्रभू
सारखे जिवाभावाचे होते मावळे
म्हणूनच आज ही शिवाजी राजे
सोबत त्यांचे ही नाव घेतात सगळे

शिवबांचा इतिहास प्रत्येकाच्या
मनामनात चैतन्य जागे करतो
त्यांच्या नुसत्या नावाने देखील
शत्रूला दोन पाऊल मागे हटवितो

पुन्हा देशात शांतता व सुव्यावस्था
निर्माण होण्यासाठी एकता पाहिजे
मावळयांसारखी फौज तयार करण्या
या देशाला अजूनही शिवबा पाहिजे

## तोच खरा शिक्षक

मुलांच्या हृदयात जाऊन
त्यांच्या संवेदना जाणून
घेऊन जो शिकवितो
तोच खरा शिक्षक

मुलांच्या मनात काय आहे
आपणास करायचे काय आहे
हे ज्याला कळते
तोच खरा शिक्षक

मुलांची आवड निवड
त्याला मिळणारी सवड
ओळखून जो शिकवितो
तोच खरा शिक्षक

पुस्तकाच्या मागे न लागता
अनुभवाचे बोल ऐकविता
मुलांचे विश्व जो घडवितो
तोच खरा शिक्षक
शिकून मोठे झाले
शहाणे सवरते बनले
रस्त्यात ज्यांना आदराने
नमस्कार केला जातो
तोच खरा शिक्षक

## *अभिव्यक्ती स्त्री मनाची*

बंदिवासात होते मी
घरातच पडले मी
अन्यायात सडले मी
मूकपणे रडले मी

कित्येक छळले मला
कित्येक पोळले मला
कित्येक जाळले मला
कित्येक टाळले मला

युग बदलत गेले
लोकं बदलत गेले
नारी आले शिकलेले
शिक्षणाने क्रांती झाले

मी नारी कलयुगाची
अभिव्यक्ती स्त्री मनाची
माझ्याकडे पाहण्याची
हिंमत नाही कुणाची

सर्व क्षेत्रात सन्मान
नारीचा होतंय मान
करू नका अपमान
जपा तिचा स्वाभिमान

## ।। मृत्यू ।।

जवळच्या व्यक्तीने जाण्याने
निर्माण होते जी पोकळी
त्यांचे कार्य फक्त उरते
निर्माण होते नवी साखळी

घरचा कर्ता सवरता जाण्याने
अख्खं कुटुंब होतो बेसहारा
त्यांना सावरायला हवा असतो
जवळच्या व्यक्तीचा सहारा

उठता बसता येते आठवण
काही दिवस मन होते बेचैन
डोळयातील अश्रू संपून गेले
रडण्याने आवाज होतो क्षीण

त्यांच्या आठवणी मिटायला
लागतो काही कालावधी
नंतर हळू हळू सावरायला
जरा पाहिजे असतो अवधी

## कविता

कागद आणि पेन
कविता झाली तयार
मोबाईल अन चहा
अजुन काय हवे यार

हिरवळ दाटे चहूकडे
डोळयांना ही सुख मिळे
प्रसन्न होते लहान थोर
साजरी होते असे सोहळे

जगात सर्व काही मिळते
ते अडीच अक्षरी प्रेमाने
सुखी समृद्ध जीवन जगू
एकमेकांच्या सहकार्याने

## आला श्रावण

आला श्रावण श्रावण
घेऊन नात्यांचा सण
होते एकमेकांची भेट
जुळतात सर्वांचे मन

श्रावण महिन्यात बघा
पडतो मुसळधार पाऊस
श्रावणात अनेक सण त्यात
पोळाची शेतकऱ्याना हौस

पोळयाचा सण आला
घेऊन पाऊस पाऊस
असा दिसभर पड
नको जाऊस जाऊस

रिमझिम पाऊस पडे सारखा
शाळेच्या मैदानात पूर चढे
पाणीच पाणी चहूकडे, मुलांनो
जाऊ चला आपल्या घराकडे

## पावसात ......

आभाळ दाटले बघ नभी
होईल भरपूर बरसात
पाऊसधारा अंगावर झेलू
मनसोक्त नाचू या पाण्यात

वादळवारे लगेच सुटतील
ढगे पळतील वेगात
छत्रीविना पाऊस पाहू
भिजुन जाऊया पाण्यात

पडला जोराचा पाऊस
साचले पाणी खड्यात
कागदाची होडी करू या
वाहून जाऊ द्या पाण्यात

थांबला एकदाचे पाऊस
खेळूया झिम्मड पाण्यात
एकमेकावर पाणी उडवू
खेळ आलाय पहा रंगात

## *।। स्वातंत्र्य दिन ।।*

15 ऑगस्ट 47 चा
तो सोनियाचा क्षण
पारतंत्र्यातून मिळाला
आम्हाला स्वातंत्र्य दिन

जुलमी इंग्रजांच्या विरोधात
लढले टिळक गांधी नेहरू
तेंव्हा कुठे लाभले आम्हा
स्वातंत्र्य दिवस कसे विसरू
देशाच्या स्वातंत्र्यासाठी
अनेकांनी दिले प्राण
पारतंत्र्यातून मिळाला
आम्हाला स्वातंत्र्य दिन

जनता होती अडाणी दरिद्री
तिला कळत नव्हते काही
जनजागृती व्हावी म्हणून
त्याची चळवळ उभी केली
जनतेला कळले हे जेंव्हा
क्रांतीचा केला त्यांनी पण
पारतंत्र्यातून मिळाला
आम्हाला स्वातंत्र्य दिन

भगतसिंग,राजगुरू व सुखदेव
शहीद झाले स्वातंत्र्यासाठी
बाबू गेनू ही शहीद झाला

स्वदेशीच्या वस्तूसाठी
या शूर क्रांतीकारकांची
आम्हांला आहे जाण
पारतंत्र्यातून मिळाला
आम्हाला स्वातंत्र्य दिन

भारतमातेचा जयजयकार
करताना स्फुर्ती मिळेल
तिरंगा फडकत पाहून
गर्वाने मान डुलेल
या स्वातंत्र्य दिनाची
आम्हाला आहे भान
पारतंत्र्यातून मिळाला
आम्हाला स्वातंत्र्य दिन

## ओढ

राधेला कृष्णाची ओढ
गायीला वासरची ओढ
माईला लेकरांची ओढ
नेत्याला सत्तेची ओढ

बहिणीला भावाची ओढ
बायकोला माहेरची ओढ
व्यापाऱ्याला ग्राहकांची ओढ
डॉक्टरला पेशंटची ओढ

कोणाला कशाची ओढ
कोणाची चालते चढाओढ
शेतकऱ्यांना पावसाची ओढ
कर्मचाऱ्यांना पगाराची ओढ

विद्यार्थ्यांना असावी अभ्यासाची ओढ
अधिकाऱ्यांना असावी कामाची ओढ
नेत्यांना असावी विकासाची ओढ
सर्वांनाच असावी अशी ओढ

## रमाई

सोसून सारे दुःख ती
कधी मागे हटली नाही
चालविण्या सुखाचा संसार
धन्य ! ती भिमाची रमाई

शेण गोळा केली
पडेल ते काम केली
भीमरायच्या शिक्षणाला
पैसे कमी पडू नाही दिली
धन्य ! ती भिमाची रमाई

डोळ्यासमोर पाहिले
तिने अनेकांचे मरण
पण ती कधीच गेली नाही
मरणाला शरण
धन्य ! ती भिमाची रमाई

गोरगरीब उपाशी पोरं
पाहून जीव तुटत होता
काहीच नव्हतं जवळ तेंव्हा
सोन्याची बांगडी विकला होता
धन्य ! ती भिमाची रमाई

अंथरुणाला बिलगली तशी
भीमा जवळच होता बसुनी
मे महिन्याच्या सत्तावीसला
गेली आम्हा सर्वांना सोडुनी
धन्य ! ती भिमाची रमाई

## ।। विठ्ठल विठ्ठल ।।

नाम विठ्ठल
काम विठ्ठल
माझे दाम ही
विठ्ठल विठ्ठल

कर्म विठ्ठल
मर्म विठ्ठल
माझा धर्म ही
विठ्ठल विठ्ठल

पुढे विठ्ठल
मागे विठ्ठल
माझ्या या देही
विठ्ठल विठ्ठल

उठता विठ्ठल
झोपता विठ्ठल
माझ्या सर्वस्वी
विठ्ठल विठ्ठल
चालता विठ्ठल
बोलता विठ्ठल
काम करता ही
विठ्ठल विठ्ठल

## ।। पुस्तक ।।

पुस्तक म्हणजे ज्ञानाचा झरा
पुस्तक म्हणजे मित्र खरा

पुस्तक बोलतो माझ्याशी
पुस्तक ज्ञान देतो सगळ्यांशी

पुस्तकांचे असावे एक घर
वाचत बसावे दिवसभर

पुस्तक देतो स्नेह आणि प्रेम
प्रेयसीच्या प्रेमासारखीच सेम

एकटा असतो जेंव्हा घरात
डोळे खुपसून असती पुस्तकात

पुस्तकाला करू नका दूर
त्याशिवाय मनाला लागते हूर

चला पुस्तकांशी मैत्री करू
आपल्या डोक्यात ज्ञान भरू

## ।। विठ्ठलाचा ध्यास ।।

मनी लागे आस
भेटावया खास
लागला तो ध्यास
विठ्ठलाचा

दूर ती पंढरी
मुखी नाम हरी
पायी चाले वारी
वारकरी

ऊन वारा पाणी
कुणी अनवाणी
संग अन्नपाणी
घेऊनिया

ओढ पंढरीची
पर्वा ना जीवाची
नाम जपायची
पांडुरंगा

सोडुनिया घर
चालला तो दूर
लागे हूर हूर
मनाची

## पावसाला साकडं

खूप झाली प्रतीक्षा आता
अजून वाट तू लावू नको
कंटाळली सर्वच जनता
आता वेळ तू लावू नको

रोहिणी गेली न बरसता
आता कळ तू पाहू नको
पाण्याचा ठणठणाट सर्वत्र
आता जाळ तू लावू नको

बळीराजा सज्ज आहे पेरण्या
त्याची सत्त्वपरीक्षा तू पाहू नको
शेतात पिकेल तर माणूस जगेल
तशी वेळ तू कोणावर आणू नको

साऱ्यांचे मागणे एकच आहे
बरस जोरात तू मागे पाहू नको
ओलेचिंब करून टाक साऱ्यांना
छत्री उघडण्यास वेळ देऊ नको

## योग

योग दिन साजरा करण्याचे
जगात संदेश जाऊन दिला
चार वर्षांपूर्वी देशाने ठरवले
योग दिवस एकवीस जूनला

यावर्षी देशात पुन्हा आले
नरेंद्र मोदींचे सत्तेत सरकार
योग दिवसाची मग सर्वत्र
झाली तयारी जोरदार

महाराष्ट्रात नांदेड नगरीत
सजले राज्यस्तरीय योग
जिल्हयातील सर्वांसाठी
मिळाला सुट्टीचा संयोग

शाळेवरची मुलं सोडून
गुरुजी गेले नांदेडला
योग दिवसाचा आनंद
मुलांना देता नाही आला

स्वतःच्या सुखासाठी पहा
यांनी आपले कर्तव्य विसरले
योगगुरू रामदेव बाबासोबत
सेल्फीचे फोटो ही काढले

मुलांना कळेना की

आज सुट्टी का मिळाली
हात पाय हलवून हलवून
सारे अंग दुखू लागली

यापेक्षा आपली रोजची
शाळा केंव्हाही बरी
मित्रांसोबत खेळायला
मनसोक्त मिळते तरी

## विजमरण

मृग नक्षत्रा ची सुरुवात
सर्वत्र काळेकुट्ट ढग
काही क्षणात पाऊस पडणार
मोर पिसारा फुलवून नाचणार
गावातील पोर पाण्यात बागडणार
आई सोबत शेतात गेलेली
लहान पिल्लू काखेत भिजणार
या पावसात हे सर्व घडणार

असे वाटले असताना क्षणात
नको असलेले घडले
आकाशात वीज चमकले
ढगांचा झाला गडगडाट
कुठे तरी वीज पडली
लोकं बोलू लागली
क्षणात एक बातमी आली
राम्याच्या आईवर वीज पडली

काखेतले लेकरु बिलगून
तशीच चिकटुन होती
रडत नव्हती की हसत नव्हती
क्षणात या पावसाने साऱ्या
गावचा आनंद हिरावून नेला
तोच नेहमीचा पाऊस आत्ता
नकोनकोसा वाटू लागला

## प्रपोज

मला कधीच जमले नाही
तिला प्रपोज करायला
माझ्या मनात नेहमी भीती
तिच्यासोबत बोलायला

संधीच्या शोधात होतो फिरत
माझा प्रपोजल तिला देण्याचा
माझ्या मनातील गोष्टी तिला
वेगवेगळ्या माध्यमातून सांगण्याचा

मित्र ही देत होते प्रोत्साहन
एकदाचं जाऊन सांग तिला
माझं तुझ्यावर खूप प्रेम
धाडस कर एकदा सांगायला

दिवस असेच सरत होते
जवळ येत होता व्हॅलेंटाईन
चाचपडत तिच्या जवळ गेलो
हातात गुलाबाचे फुल घेऊन

पण हाय रे देवा मला
उशीर झाला होता
तिच्यासोबत मला
दुसराच दिसत होता
मान्सून
मान्सूनची ओढ लागली

येईल काही दिवसांत
मजा करू खूप खूप
नाचू पहिल्या पावसात

चातकपक्ष्याप्रमाणे वाट पाहती
लक्ष देती फक्त पावसाकडे
पड रे पाऊस लवकर म्हणून
डोळे लावून बसले आभाळाकडे

प्रचंड उष्णता आणि गरमी
प्रत्येकजण होतो हैराण
पावसाच्या येण्याने मिळेल
सर्वांना एकदाचे समाधान

पावसाच्या येण्याने सर्व
लागतात आपापल्या कामाला
मुले जाती शाळेला आणि
शेतकरी जातो आपल्या शेताला

संपली पावसाची प्रतीक्षा
बरसल्या पाऊसधारा
धरती झाली थंडगार अन
हवेत सुटला गार गार वारा

## " पाऊस "

कुणी सांगेल का ?
पाऊस गेला कुठे ?
कुणी बोलेल का ?
पाऊस दडला कुठे ?

दरवर्षी हेच
येरे माझ्या मागल्या
का नाही पाऊस
कारणे नाही कळाल्या

झाडेही लावली
झाडे जगविली सुध्दा
पाण्यासाठी आम्ही
भंडारा केलो सुध्दा

देवाला पाण्याने
अभिषेक करविले
धोंड धोंड पाणी
मुलांनी गाणे गाईले

पाऊस रुसला
हे उशीरा कळले
रुसलेल्या मना
रुजविता न आले

पावसाळा असा
संपून गेला अखेर
शेतातील पिके
करपली जागेवर

## ।। मराठी भाषा दिवस ।।

मी वाचतो मराठी
मी जगतो मराठी
माझ्याच डोळयादेखत
संपताना पाहतो मराठी

मी हसतो मराठी
मी रडतो मराठी
माझ्या डोळयादेखत
अश्रू गाळतो मराठी

मी चालतो मराठी
मी पळतो मराठी
माझ्या डोळयादेखत
असहाय होतो मराठी

मी बोलतो मराठी
मी लिहितो मराठी
माझ्या डोळयादेखत
अडखळतो मराठी

माझ्या नसानसात मराठी
माझ्या मनामनात मराठी
माझ्या डोळयादेखत
तरीही दुबळा ठरतो मराठी

## ।। निवडणूक निकाल ।।

निवडणूक निकाल लागण्यापूर्वी
जो तो निकाल लावतो आहे
निवडणूक आपणच जिंकणार
आत्मविश्वासाने बोलतो आहे

निकालापूर्वी असे बोलणे म्हणजे
आपल्या मनाचे समाधान आहे
ज्यांनी पाच वर्षात काम केले
त्यांच्या गळयात विजयाचा मान आहे

भावी सरकार कोणाचेही येवो
जनतेला याचे काही नाते नसते
आपला माणूस जिंकून आला
यातच त्यांचा अत्यानंद असते

संविधानाच्या आधारे चालतो देश
म्हणून टिकून आहे लोकशाही
गुप्त मतदान आहे म्हणून अन्यथा
केव्हाच आली असती हुकूमशाही

चला आता वाट पाहू या
मे महिन्याच्या तेवीस तारखेची
कोण जिंकेल ? कोण हरेल ?
पर्वा नाही आपणाला कोणाची

## 45 डिग्री सेल्सियस

दिवस चढत चढत जातो
तसा ऊन ही तळपत आहे
कोणीच बाहेर पडत नाही
रस्ता निर्मनुष्य दिसत आहे

उन्हाचे चटके सोसवेना
घ्यावा सावलीचा आधार
सावली मिळविण्यासाठी
झाडांना देऊ या आभार

झाडे लावू झाडे जगवू
तरच मिळेल सावली
तोडत राहिलो झाडे तर
मिळेल कशी सावली

त्रास झाला भरपूर की
येते झाडाची आठवण
न विसरता बियांची
करूया यंदा साठवण

निसर्गाचे नियम पाळले
तर सर्व सुख मिळते
निसर्गालाच दिला त्रास
तर तेच आपणांस गिळते

-----ஜ۩۞۩ஜ-----

🌷 📅 . . **मुलगी** . . 📅 🌷

-----ஜ۩۞۩ஜ-----

मुली म्हणजे लोकांना
डोक्याचे ओझे वाटते
तिचा जन्म नको म्हणून
नको नको ते कृत्य करते

हुंड्याच्या छळापायी
ती जळत आहे
मुलगी नको म्हणून
गर्भ गळत आहे

जग चालविण्यासाठी खरे
तर मुलींची गरज असते
तीच तर कुणाची बायको
तर कुणाची आई असते

म्हणून मित्रा सांगतो तुला
सोड हुंडा आणि मुलाचा हट्ट
मुलगा-मुलगी एकसमान
विचार कर आत्ता घट्ट

## कविता

कविता कशी करावी ?
साधी करावी, सोपी करावी
दुसऱ्यांना समजेल अन
उमजेल अशी करावी

कविता कोठे करावी ?
घरात करावी, बाहेर करावी
ज्याठिकाणी सुचत असेल
त्याठिकाणी लगेच करावी

कविता कोणावर करावी ?
आई वर करावी
बायको वर करावी
जीवापाड प्रेम करणाऱ्या
जुन्या प्रेयसीवर करावी

कविता का करावी ?
मन समाधानासाठी करावी
कुणाचे तरी दुःख दूर
सारण्यासाठी करावी

## सहन किती करायचे ...?

अन्याय होतो फार
जुलुम नि अत्याचार
तोंड किती गप्प ठेवायचे
सहन किती करायचे ..?

मुलगी नको म्हणुनी
गर्भ किती वेळा पाडायाचे
मुलांसाठी सर्व प्रकार
सहन किती करायचे ..?

मुलगी आली लग्नाला की
हुंड्याचा प्रश्न सोडवायचे
हुंड्यासाठी मुलींचे बळी
सहन किती करायचे ..?

नोटाबंदीने पैसे मिळेना
किती दिवस त्रास सोसायचे
आज - उद्या करत पैश्यासाठी
सहन किती करायचे ..?

जीवनात कधी तरी मिळेल
सुख असे मन समजायचे
रोज रोज तेच रडगाणे
सहन किती करायचे ..?

# पहिल्यासारखे आत्ता

पहिल्यासारखे आत्ता
कोणी राहत नाही
पहिल्यासारखे आत्ता
कोणी वागत नाही

प्रेम जिव्हाळा माया
ओसंडून वाहत होती
अडीअडचणीला मदत
शेजाऱ्याची मिळत होती

नव्हती कशाची भीती
लोकं मिसळून राहत होती
प्रत्येकाच्या सणासुदीला
गळयात गळे घालत होती

लोकं शिकून सवरून
खूप शहाणी झाली
एकमेकांत वितुष्ट यावे
अशी कहाणी झाली

जर शिकल्यानेस असा
भेदभाव मानणारा असेल
तर यापेक्षा अनाडीपणात
देशात एकता दिसेल

पहिल्यासारखं सर्व
मिळवायचं असेल
चांगलं शिक्षण घेतलं
तरच हे घडेल

# एक तरी झाड लाव धरा

सुंदर आहे ही धरा
त्याची काळजी घे जरा
वृक्षवेलींनी सजलेली
पक्षी पाखरे गाणी गाती

निसर्ग आमचा मित्र सखा
पडतो उपयोगी अनेक वेळा
अमानुषपणे असे वागू नको
धरतीला देऊ नको कळा

मानवाच्या तीन मूलभूत गरजा
अन्न, वस्त्र आणि निवारा
सर्वच गोष्टी तोच पुरवितो
एकदा तरी त्याचा विचार करा
त्याची काळजी घे जरा

आपली इच्छा व गरज भागविण्या
जंगलातील झाडे केली साफ
स्वार्थी आपल्या या वागण्याला
निसर्ग करणार नाही माफ

पुढची पिढी जगवायची असेल
एक तरी झाड लाव धरा
निसर्ग जगला आणि वाढला
तरच राहील आपला नाव खरा
त्याची काळजी घे जरा
एक तरी झाड लाव धरा

# मेहंदी ।।

तिला पाहून गेल्यापासून
ती फारच होती आनंदात
पाहुण्यांनी देखील पसंदीचे
खास पाठविले होते संदेशात

घरात लगीनघाई झाली सुरू
नववधू स्वप्नात गेली घडून
मुहूर्त आला लग्नाचा अन
लग्न वेळेवर आले जुळून

आपल्या सासरी आली नववधू
सर्वांना भेटून झाली आनंदी
नशिबात नव्हते हे आनंद
यजमानाच्या अपघाताने
झाले दुःखी नाराज समदी

लग्नाच्या गप्पा गोष्टी चालूच होते
हळद अजून निघाले नव्हते
स्वप्नांच्या दुनियेतच वावरताना
मेहंदी अजून निघालेच नव्हते

रडून रडून तिचे डोळे सुजले
विचार करून मन जड झाले
दोन्ही हाताच्या मेहंदीला बघून
तिचे डोळे नेहमी राहतसे ओले

## ।। बेफिकीर ।।

खिशात नाही दमडी
फिरण्यात दंग आहेत
उपाशी पोरे घरात हे
खेळण्यात दंग आहेत

जगात चाललेल्या
अनैतिक गोष्टीच्या
पेपरमधील बातम्या
वाचण्यात दंग आहेत

लोकांना एकवेळचे
जेवण मिळत नाही
हे क्रिकेटचा खेळ
पाहण्यात दंग आहेत

अन्नासाठी कोणी
चालतो तर कोणी
पोटासाठी सकाळी
चालण्यात दंग आहेत

ईथे कुणाला नीट
ऐकूच येत नाही
मोठ्या आवाजात
बोलण्यात दंग आहेत

सीमेवर दुष्मनाच्या

हल्लेत जवान मरतोय
कॉमेडी शो जलवे बघत
हसण्यात दंग आहेत

नेहमीच जर तर ची
भाषा बोलणारे
नशिबावर दोष देत
रडण्यात दंग आहेत

यांना कशाचे काही
नसते देणे घेणे
बेफिकीर मौजमजा
करण्यात दंग आहेत

## विश्वास

विश्वास तुझ्यावर ठेवून
केलो फार मोठी चूक
पश्चाताप करतो आत्ता
मिळत नाही बघ सुख

वाटले होते मिळेल
माझ्या कष्टाला किंमत
घामाला मिळेना दाम
कशी भागेल माझी भूक

आज नाही तर उद्या
उगवेल चांगला दिवस
आशा ठेवलो तरी ही
माझ्या नशिबी फक्त दुःख

इथे आळशी लोकांना
बरेच काही मिळते अन
कामकऱ्यांना मनस्ताप
मला नव्हते की हो ठाऊक

डोक्यावरील कर्ज वाढतो
रोज वाढत जाते काळजी
माझ्या आत्महत्येमुळे सर्व
होतात काही दिवस भावुक

## जीवनात .....

जीवनात कधी कधी होते खरीखुरी परीक्षा
चांगले काम केलो किती तरी मिळते शिक्षा

अपार मेहनत व कामावर श्रध्दा असली की
नशिबात सर्व मिळते असावी फक्त प्रतीक्षा

गरज असेल तितकेच खर्च करावे तेंव्हा
येणार नाही वेळ आपल्यावर मागायची भिक्षा

सर्वांशी प्रेमाने रहावे आणि गोडही बोलावे
सुखीसमृध्द जीवनासाठी मिळते हीच दीक्षा

ईश्वरावर श्रद्धा ठेवावी काळजी करू नये
तोच करतो नेहमी आपल्या जीवनाची सुरक्षा

# ।। शिक्षक ।।

शिक्षकांचा सदा मला अभिमान आहे
शिक्षकांविषयी मला स्वाभिमान आहे

माणूस घडविण्याचे काम करतो
त्यामुळे समाजात मला सन्मान आहे

माझी वागणूक एक आदर्श ठरते
म्हणून चार लोकांत मला मान आहे

काय करावे अन काय करू नये
पदोपदी याचे मला अवधान आहे

नव्या तंत्रज्ञानांविषयी मुलांना
सजग करण्याचे मला ज्ञान आहे

प्रगतीपथावर नेणारा सुजाण असा
नागरिक घडविण्याचे मला भान आहे

# ।। राष्ट्रीय प्रतिके ।।

मोर आपला राष्ट्रीय पक्षी
त्याचे पंख किती नक्षीदार
पावसाळ्यात नाचतो छान
पिसारा फुलवितो डौलदार ।।

कमळ आपले राष्ट्रीय फुल
चिखल जेथे तिथे उगवतो
कुठे पांढरा कुठे रंगीन असा
हा प्रत्येकाला फार आवडतो ।।

वाघ आहे आपला राष्ट्रीय पशू
त्याला बघून होते सर्वांची थरकाप
अंगावर आडव्या काळ्या पट्ट्या
त्याच्या डोळ्यात दिसतो संताप ।।

राष्ट्रीय फळ आहे आंबा
त्याची चवच आहे न्यारी
पाहुणे रावळे आले घरी
सरबराई करायला लई भारी ।।

तिरंगा आपला राष्ट्रध्वज
केसरी, पांढरा आणि हिरवा
विविध रंगाचे आकर्षण
प्रत्येकाना वाटतो हवाहवा ।।

## ।। नववर्षाची पहाट ।।

नव वर्षाची पहा उगवली पहाट
धरू सुविचारांची नवी पाऊलवाट

जीवनात येतात असे अनेक संकटे
जशी असतात वळणावळणाची घाट

नवे मित्र जोडू जुन्या मित्रांसारखे
नकोत नुसते गोड बोलणारे भाट

विश्वास असावे पुरता आपला पक्का
जसे जंगलात असतात झाडी घनदाट

नववर्षात करूया कामे खूप छान छान
थक्क होईल जो तो पाहुनी थाटमाट

विसरून सारे मागील दुःखाचे जाळे
आठवणीत ठेवूया सुखाची लाट

आपल्या जीवनात विष कालविणाऱ्या
शत्रूंचा करूया मुळातून नायनाट

नव वर्षाची पहा उगवली पहाट
धरू सुविचारांची नवी पाऊलवाट

## ।। शाळा - शिक्षण ।।

पटसंख्या किती ही असो
शाळा बंद व्ह्ययलाच नको
सारे शिकूया पुढे जाऊया
शिक्षणाचे ब्रीद विसरायला नको

सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण
गावागावातून मिळायलाच हवे
अंक आणि अक्षराचे ज्ञान
शाळेशाळेतून कळायालाच हवे

गावात शाळा असलेल्याची
बात काही औरच असते
लहान मुले कसे बरे जातील
शाळा घरापासून दूर असते

शिक्षणाचे महत्व काय असते हे
निरक्षराला विचारून पहावे
शिक्षणाने जीवनी काय मिळते हे
समृद्ध झालेल्याचे जीवन पहावे

शाळेतून जे काही मिळते
त्यास जगात तोड नाही
शिक्षणाशिवाय आपले
जीवन काही गोड नाही

## ।। साथ ।।

मिळेल तुमची अशीच साथ
राहतील पाठीशी अनेक हात
संकटाशी सामना करून
संपवू अंधारी काळोखाची रात

एकजुटीने काम केले की
यश हमखास मिळते
एकट्याने जे कधी होत नाही
ते सर्वांच्या सहकार्याने होते

समाजात राहायला शिकलं
एकजुटीने वागायला शिकलं
एकमेकांच्या सुखदुःखात
सहभागी व्हायला शिकलं

एकटा जीव सदाशिव म्हणजे
एकलकोंडा होऊन जातो
मनावर देखील ताबा राहत नाही
मनोरुग्ण झाल्यासारखे वागतो

जीवनात करायची असेल प्रगती
तर सर्वांची घेत चला संगत
सर्वांच्या सोबतीने येत राहील
तुझ्या जीवनात ही रंगत

कुणाचे आशीर्वाद मिळविण्यासाठी
आपल्या पाठीवर असावे हात
आशीर्वादाने सौख्य लाभते अन
सुख समृद्धी मिळते आयुष्यात

## नको भृणबळी

आई, मला जग बघू दे
बाबाला एकदा भेटू दे
माझी मुलगी होती
मला गर्भातुन बोलत
मी ओझे नाही होणार
कोणाच्या घरात
मी काम करेंन
घरातील सारी
शिक्षण घेईन खुप
होईन अधिकारी
तुझ्या हाताला देईन
नेहमी मदत
विचार करू नको
दे मला साथ
आई, तुझं मन कर
एकदा कठोर
तुझ्यासारखेच माझं
जीव आहे तर
निश्चय केला पक्का
नको भृणबळी
मुलगा-मुलगी समान
संधी द्या वेळोवेळी
तिचे बोलणे ऐकून
मन माझं गहिवरलं
गोंडस कन्या रत्नाला
जन्म मी दिलं

## आई असावी जिजाऊ सारखी

पोटच्या लेकरासाठी
हाल अपेष्टा सोसून
लेकरांना सुरक्षित ठेवणारी
आई असावी जिजाऊ सारखी

लहानपणी ऐकवुनी
शुरांविराच्या गोष्टी
हातात तलवार देणारी
आई असावी जिजाऊ सारखी

शत्रूंची माहिती देऊनी
स्वराज्य निर्माण करा
अशी प्रेरणा देणारी
आई असावी जिजाऊ सारखी

पर स्त्री मातेसमान
भेदभाव मानू नको
प्रेमाची भावना शिकविणारी
आई असावी जिजाऊ सारखी

आजच्या काळात लुप्त
पावले आहेत सारे संस्कार
म्हणून परत संस्कार करणारी
आई असावी जिजाऊ सारखी

## मतदान

आई माई ताई अन अक्का
विचार करा एकदा पक्का
एकमेकांना जागृत करुनी
मतदानाचा वाढवा टक्का

भारताचा आन आणि बाण
लोकशाहीचा आहे प्राण
त्याला बळकट करण्यासाठी
न चुकता करावं मतदान

एकदाच तलाव भरत नसते
थेंबा थेंबाने तळे बनत असते
आपल्या एका एका मताने
मतदानाची टक्केवारी वाढते

एकमेकांना जागृत केल्याने
वाटचाल होईल महा दिशेने
जाणून घेऊ महत्व मताचे
सत्ता पलटते एका मताने

चला उठा आता जागे व्हा
मतदान करण्या सज्ज व्हा
जागरूक नागरिक म्हणून
मतदानाचा हक्क बजावा

## ।। अमूल्य आहे तुझे  वोट ।।

घेऊ नको तू कोरी नोट
अमूल्य आहे तुझे वोट

लोकशाही करण्या भक्कम
बघू नको तू रक्कम
नंतर मिळेल तुला चोट
अमूल्य आहे तुझे वोट

जाणून घे मताची शान
श्रेष्ठ आहे मतदान
शाईचे दाखव तू बोट
अमूल्य आहे तुझे वोट

सर्वांना तू सोबत घे
मतदान केंद्रावर ने
देण्या लोकशाहीचे घोट
अमूल्य आहे तुझे वोट

जरा ठेव आपले भान
हक्क व कर्तव्याची जाण
समाधानाने भरेल पोट
अमूल्य आहे तुझे वोट

कवी नासा सांगतो सार
मतदानाचा करा विचार
कुठे लावू नका गालबोट
अमूल्य आहे तुझे वोट

## औंदा मतदान करायचं

लोकसभेचं आलयं वारं
नेते फिरती भिरभिर भिरं
पसंदीचा उमेदवार निवडायचं
औंदा मतदान करायचं
मला औंदा मतदान करायचं .....

गावात समद्याना समजून सांगणार
मी कोणच्या गावाला नाही जाणार
लोकशाही मजबूत करायचं
मला औंदा मतदान करायचं

मतदान केंद्र आहे घराजवळ
मतदान करण्यास काढूया वेळ
साऱ्या लोकांना हेच सांगायचं
मला औंदा मतदान करायचं

पैसा घेऊ नको एका वोटापायी
नको ईज्जत घालवू नोटापायी
चांगला सक्षम नेता निवडायचं
मला औंदा मतदान करायचं

## आरक्षण

देऊन आम्हाला आरक्षण
समृद्ध केले आमचे जीवन

गावाबाहेरची होती वस्ती
लोकं होती दुःखी कष्टी
त्यांना नव्हते कोणाचे रक्षण
देऊन आम्हाला आरक्षण
समृद्ध केले आमचे जीवन

आमच्या स्पर्शाचा विटाळ
जिवंतपणी किती तो झळ
माणुसकीचे नव्हते लक्षण
देऊन आम्हाला आरक्षण

समृद्ध केले आमचे जीवन
उद्धार करण्या या कुळाचा
जन्म झाला भीमरायाचा
इतिहासात नोंदला तो क्षण
देऊन आम्हाला आरक्षण
समृद्ध केले आमचे जीवन

त्यांनी केला खूप अभ्यास
समाजसेवेचा धरुनी ध्यास
त्यांनी केले वंचितांचे रक्षण
देऊन आम्हाला आरक्षण
समृद्ध केले आमचे जीवन

लोक कल्याणासाठी केला कायदा
मागासवर्गीयाना मिळाला फायदा
सर्वांची आत्मा आहे संविधान
देऊन आम्हाला आरक्षण
समृद्ध केले आमचे जीवन

## ।। आठवण बाबासाहेबांची ।।

समाजात हीन वागणूक होताना
डोळ्यात अश्रूची साठवण होते
तसे दृश्य पाहून आज ही
बाबासाहेबांची आठवण येते

उच्चभ्रू लोकांच्या पंगतीत
बसायला हरकत असते
स्पृश्य आणि अस्पृश्य म्हणून
समाजात फारकत असते

बाबासाहेबांना आलेले अनुभव
अजून ही स्मरणात आहेत
तेच अनुभव पुन्हा पुन्हा
लोकांच्या जीवनात येत आहेत

शिक्षणाने सर्व विकास होतो
असे अनेक महात्मे सांगून गेले
सारे शिकून शहाणे झाले तरी
यांच्यात फरक का नाही पडले

असे विचार जेंव्हा करतो
मनात क्रांतीची मशाल पेटते
तेंव्हा एकटाच धावतो सैरभैर
भेटतो अनेकांना मन विशाल वाटते

अनेक विचारवंतांना वाटले होते
शिक्षणाने काही बदल होईल
पण वाटले नव्हते
शिकलेल्याच माणसाच्या
याच शिक्षणाने एवढा घात होईल

## जीवन एक सारीपाट

जीवन एक सारीपाट आहे
त्यात सुख आणि दुःख आहे

जीवनात सर्वस्व हवे हवे
दुःखाचा ससेमिरा नको आहे

जीवनात करायचे काही
दुःखाला तोंड देणे भागच आहे

जीवनात दुःख आल्याशिवाय
सुख कसे कळणार आहे ?

जीवनाचा सारीपाट खेळतांना
सर्वांना सांभाळणे गरजेचे आहे

सुखात सर्वच साथ देती मात्र
दुःखाच्या वेळीच परीक्षा आहे

या परीक्षेत जो होतो उत्तीर्ण
त्यालाच सारीपाट कळले आहे

म्हणूनच जीवन नको वाटले तरी
मजला दुःख हवे आहे .....
मजला दुःख हवे आहे.....

## जीवन

जन्मलास म्हणुनी जगला, काळ येता मेला
तुझ्या या जीवनी, काही अर्थ नाही राहिला

बालपण खेळण्यात, तारुण्य पळण्यात
वेळ असाच निघून जात राहिला

स्वतःच्या घरी अशांती ठेवतोस
पर घरी मात्र शांती ठेवला

आई बाबांना तू गेला विसरुनी
जाऊन बसला तू दूर देशाला

आधार होशील म्हणून जन्म तुला दिले
तू मात्र त्यांची काठीच मोडून काढला

जन्मलास म्हणुनी जगला, काळ येता मेला
तुझ्या या जीवनी, काही अर्थ नाही राहिला

# आई

झुळझुळणारा झरा म्हणजे आई
प्रेमाचा सागर म्हणजे आई
कुशीत जिच्या मिळते
मोद देणारी म्हणजे आई

मंजुळ अंगाई गीताने
स्वप्नात नेणारी ती आई
त्यागून सर्व मोह
महान बनविते ही आई

साक्षीने सांगतो मी
ईतिहास रचविते आई
दया क्षमा शांती
तिचे नाव आहे आई

दुःखाच्या वेळी साऱ्यांना
आठवते ही आई
सुखाच्या काळात सर्वांना
साथ देते ती आई

## आईची माया

आईची माया
खूपच आगळीक
कोणाला कळे

पोटात आग
पायाला काम
हाताला गोळे

नऊ महिने
पोटी जपले
सोसुनी त्रास

घरा-दारात
राबराबती
काळजापायी

शिकून मोठा
शहाणा झाला
शिक्षणापायी

## माय

आईची माया जगाहून निराळी
आईविना जीवन आयुष्याची पोकळी

समंजस असो वा असेल ती अडाणी
जीवनाचे सार सांगुनी करी बाळा शहाणी

जिजाऊच्या प्रेमाने राजे शिवाजी घडले
मावळयांच्या मदतीने मराठी राज्य निर्मिले

आई असेल कशीही कुमाता न भवति
लेकरांना सांभाळूनी करी देशाची प्रगती

आईविना जीवनाची पाटी असेल कोरी
स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

## दिवस

सुखाचे की दुःखाचे
ते कधीच न मोजायचे
दिवस असेच हे सरायचे

बालपणी खेळण्यात
सवंगड्यासह पळण्यात
मौजमजा करण्यात
बालपण हे संपायचे
दिवस असेच हे सरायचे

तारुण्यात होई वेडा
मित्रांचा घेऊन गराडा
कमवायचे जरी थोडा
मौजमस्तीत फिरायचे
दिवस असेच हे सरायचे

वार्धक्यात चिंतन करे
बेरीज वजा काय उरे
जिवंत असूनी दूर सारे
वेळ परत येत नसायचे
दिवस असेच हे सरायचे

ज्या वेळेला ते काम
त्यातच असतो राम
तेंव्हाच होईल नाम
जीवन सार वेळी कळायचे
दिवस असेच हे सरायचे

# आईच्या छायेत

आईची सावली
आम्हांला पावली
म्हणून जगली
आजीवन

आईची ममता mahti
कुठे ना मिळती
सारे भटकती
सभोवार

आईचा पदर
सदा डोक्यावर
पाण्याचा घागर
माझ्यासाठी

आईच्या छायेत
प्रेमाच्या मायेत
सारे येताहेत
तिच्यापाशी

## स्वच्छ शाळा सुंदर शाळा

स्वच्छ शाळा सुंदर शाळा
मुलांचा लागला पहा लळा

शाळेत होती नित्य परिपाठ
त्यातून मिळते चांगले पाठ

शाळेत आहेत झाडे हिरवेगार
शुद्ध हवेत आम्ही खेळतो फार

गुरुजी आमचे मनमिळाऊ
सर्वांना देतात गोड खाऊ

## ।। थारा ।।

कुटुंबाचा भार एकट्यावर सारा
कसा तरी पेलवत होतो हा भारा

सुखी समृद्ध जीवन जगण्यासाठी
काढावे लागतात घामाच्या धारा

शरीर साथ देत होते मी ही होतो तयार
मात्र काम मिळेना फिरत होतो आवारा

सोयरे नातलग जवळच्या मित्रासह
अनेकांनी केला माझ्यावर मारा

जीवनात घडत होते छोटे मोठे अपघात
जणू ऐनवेळी पडल्या पावसाच्या गारा

कोणतेही प्रसंग मुळी सांगून येत नसते
माझे जीवनच झालंय जणू वादळवारा

जगातील लोकं खूपच स्वार्थी नि मतलबी
पैसा असेपर्यंतच देतात कोणालाही सहारा

नसेल जवळ पैसाअडका धनदौलत
अश्या बिकट प्रसंगी करतात बेसहारा

संकटकाळी मदतीचा हात पुढे करून
मागितले भीक तरी देत नाही चारा

सारे फक्त बोलके बाहुलेच वाटतात
दुःखांच्या वेळी कुणी देत नाहीत थारा

## घुसमट

माझ्या मनात सारखी चालू असते घुसमट
बाहेरचे वातावरण पहा किती आहे दमट

घरातल्या संस्कारात जगलो वाढलो
शाळेच्या शिकवणीतून पुढे चाललो
जिकडे पाहावे तिकडे चाललाय कपट
बाहेरचे वातावरण पहा किती आहे दमट

जसे कळत गेले जीवनाचे काही गोष्टी
कसा जगू विचारात होतोय दुःखी कष्टी
शिकून झालो शहाणा लागली मागे कटकट
बाहेरचे वातावरण पहा किती आहे दमट

एक मात्र सत्य बाहेरचे जग आहे वेगळेच
खोटं नाटं बोलून जीवन जगतात सगळेच
असे ढोंग कळाले की मनस्ताप होतो दुप्पट
बाहेरचे वातावरण पहा किती आहे दमट

त्याच त्या विचाराने मनाचा होतो चेंदामेंदा
काही सुचत नाही डोक्याचा होतो फालुदा
विचार येतो मनात जीवन संपवावे झटपट
बाहेरचे वातावरण पहा किती आहे दमट

## इथे नांदती

इथे नांदती विविध जाती धर्म पंथ
होऊन गेलेत अनेक महात्मा संत

जीवनाचे सार सांगून उपदेश दिले
त्याच्याच मार्गाने जीवन हे चालले
सुखी जीवन जगू या पाहू नका अंत

एकमेकां साहाय्य करू, नको भेदाभेद
आपण सारे भाऊ , नको कोणता खेद
साऱ्यांना जगण्याचे उपदेश दिले महंत

उच्च-नीच, गरीब-श्रीमंत दरी दूर करू
हातात हात घालून दुःख आपले सारु
एकत्र नांदू सारे मनात नको कसली खंत

## एक तरी दिवा लाव

स्वार्थीपणा वाईट असते
सोडून दे तसला हाव
दुसऱ्यांच्या मदतीसाठी
एक तरी दिवा लाव

आपलेच म्हणणे रेटू नये
दुसऱ्यांना देत जावे भाव
लोकांसाठी झिजतांना
एक तरी दिवा लाव

जनकल्याणासाठी झटले
तुझे जगात होईल नाव
गोरगरिबांच्या कामासाठी
एक तरी दिवा लाव

मरावे परी कीर्ती रूपे उरावे
असे काही तरी काम कराव
इतरांना प्रेरणा देण्यासारखं
एक तरी दिवा लाव

जाता जाता एवढंच सांगतो
जीवन अनमोल आहे राव
मृत्यूनंतरही नाव राहण्या
एक तरी दिवा लाव

## ।। नांदेड जिल्हा ।।

नांदेड जिल्ह्याची महती न्यारी
महाराष्ट्र राज्यात ही लई भारी

जिल्ह्यात आहेत तालुके सोळा
त्याची माहिती करू या गोळा

नांदेडची ओळख देते गुरुद्वारा
अर्जापुरात केळीच्या खूप बागा

रेणुकादेवीमुळे प्रसिद्ध माहूर
व्यापारासाठी आहे देगलूर

धर्माबादची तिखट मिरची
किल्ला प्रसिद्ध कंधारची

सैनिकी प्रशिक्षण मुदखेडात
रानमेवा विपुल मिळते मुखेडात

नायगाव वाहतुकीचे मध्यवर्ती स्थान
हदगाव जिल्ह्याचे केंद्रीय स्थान

परमेश्वर बसतो हिमायतनगरीत
दासगणूचे दर्शन होते उमरीत

लोहाची आठवण दही धपाटा
भोकरमध्ये खिचडीचा सपाटा

किनवट म्हणजे जंगलाचे रान
सैनिकी विद्यालय बिलोलीची शान

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं.**

**नासा येवतीकर यांचं हे सहावं पुस्तक.**

नासा येवतीकर हे नांदेडच्या ग्रामीण भगातील शिक्षक. विद्यार्थ्यांप्रती शिकवण्याची व विकासाची प्रचंड तळमळ, देशाबद्दल अतोनात प्रेम आणि उपजत प्रतिभा यांचे फ़ळ म्हणजे त्यांचे लेखन. ते समाज बदलण्याच्या हिरीरीने लेहीतात. एक जोमदार ऊर्जा त्यांच्या लेखनात असते. पण अशा लेखकांना योग्य प्रकाशक मिळणं कठीण जातं. एकतर ग्रामीण महाराष्ट्रात प्रकाशक कमीच. त्यात लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहोत. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड. पण त्यांना योग्य प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे?

ई साहित्य प्रतिष्ठान

या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

शुभम पाटील, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा,

विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?